राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौजे होणीहिप्परगा ता.उदगीर , जि. लातूर या वाढीव दरडोई खर्च असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः पापुयो - २०१९/प्र.क्र.९४/पापु-१८

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२
दिनांक: १९ सप्टेंबर, २०१९

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-७, दिनांक १७ मार्च, २०१०
२) शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७ दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३
३) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-७, दि. २२ जानेवारी, २०१४.
४) शासन निर्णय क्रमांकः क्र. ग्रापाधो-१११४/प्र.क्र. २२/पापु-०७ दि. ०९ जुलै, २०१४
५) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र. ५२/पापु-०७ दि. १७ ऑक्टोबर,२०१४
६) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-७/दि.१६ फेब्रुवारी, २०१५.
७) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११११/प्र.क्र.१३४/पापु-७ दि. २० फेब्रुवारी, २०१५
८) शासन निर्णय क्रमांक : ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-७ दि.१० मार्च, २०१५
९) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो/१११४/प्र.क्र.६१/पापु-७, दि. १५ जून, २०१५
१०) शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-७ दिनांक ७ मे, २०१६
११) शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०१७/प्र.क्र.५३/पापु-७, दिनांक ९ मार्च, २०१८
१२) शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१७१/ पापु-७ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर याचे पत्र क्रमांक जिला/लपा/पापु/कार्या-०६/कावि-/१९ दिनांक १३/०२/२०१९
१४) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांचे तांत्रिक मान्यता आदेश क्र.जा.क्र.जिला/लपावि/कार्या-०६/ता.मा.१/२२ दिनांक ३१/०१/२०१९

प्रस्तावना-

मौजे होणीहिप्परगा ता.उदगीर , जि. लातूर या नळ पाणी पुरवठा योजनेचा दरडोई खर्च हा विहीत निकषापेक्षा जास्त असल्यामुळे सदर नळ पाणी पुरवठा योजनेस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी संदर्भ क्रमांक १३ अन्वये शासनाच्या मान्यतेकरिता सादर केला आहे. प्रस्तुत नळ पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद,लातूर यांनी संदर्भ क्रमांक १४ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. त्यामुळे **मौजे होणीहिप्परगा ता.उदगीर , जि. लातूर** या नळ पाणी पुरवठा योजनेच्या वाढीव दरडोई खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

मौजे होणीहिप्परगा ता.उदगीर , जि. लातूर या नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ५८१७/- (४० LPCD,३० मी. पेक्षा जास्त स्टॅटीक लिफ्ट असलेल्या योजनांकरिता) एवढा दरडोई खर्च असलेल्या योजनेच्या रु.७०.५५ लक्ष (अक्षरी रुपये सत्तर लाख पंचावन्न हजार फक्त) इतक्या ढोबळ किंमतीच्या अंदाजपत्रकास व आराखड्यास राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषद मार्फत करण्यात यावी. योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. योजना यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे याची खात्री महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करावी, तसेच योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी संदर्भाधिन क्रमांक ५ येथील दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

२) योजनेची अंमलबजावणी होऊन कंत्राटदारा मार्फत योजना किमान १ वर्ष चालविण्यात येणार असली तरी ग्रामस्थांकडून या एक वर्षाचीही पाणीपट्टी वसूल करण्यात यावी. वसूल करण्यात आलेली पाणीपट्टी योजना चालविणाऱ्या संस्थेस देण्यात यावी.

३) योजनेची कामे विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत.

४) योजनेसाठी आवश्यक भूसंपादन व इतर सर्व परवानग्या प्राप्त करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यात यावी. सदर समिती रेल्वे/ रस्ते/वन जमिनीची क्रॉसींग व भूसंपादनाचा प्रत्येक महिन्याला आढावा घेईल.

५) योजनेमध्ये १०० टक्के घरगुती नळ जोडण्याचा व मीटरचा समावेश करण्यात यावा. तसेच किमान ८०% नळजोडणी धारकाकडून स्वखर्चाने मीटर जोडणी घेणेबाबत हमीपत्र घेण्यात यावे व त्याची एक प्रत लॅमिनेट करुन नळ जोडणी धारकास द्यावी व एक प्रत ग्रामपंचायतीकडे ठेवण्यात यावी. तद्नंतरच कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

६) ग्रामसभा ठराव/हमीपत्र दिल्यानंतरही गावाने पाणी घेण्यास नकार दिला तरी त्याच्याकडून किमान ५०% पाणीपट्टी वसूल करण्यात यावी. याबाबत ग्रामस्थांना निविदा प्रक्रियेच्या अगोदरच कल्पना देण्यात यावी व ग्रामसभेचा तसा ठराव घेण्यात यावा.

७) सदर योजनेचा वापर हंगामी स्वरुपात होऊ नये याकरिता योजनेत समाविष्ट गावातील अस्तित्वातील योजना चालविण्यात येऊ नयेत.

८) योजनेतील गावाचा समावेश केंद्र शासनाच्या IMIS या प्रणालीवर करण्यात यावा. योजनेची कामे मंजूर किंमतीत कालबध्द व नियोजनबध्दरित्या टप्पा-टप्प्याने पूर्ण करण्यात यावीत.

योजनेचा उद्भव विकसित झाल्याशिवाय इतर कामे सुरु करु नयेत. उद्भवामध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असल्याची खात्री केल्यानंतरच योजनेतील इतर कामे करावीत.

९) योजना चालविणे व देखभाल दुरुस्ती यासाठी येणारा खर्च भागविण्याकरिता संबंधित ग्रामपंचायतीने योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावामध्ये नमूद केल्यानुसार घरगुती, बिगर घरगुती व संस्थात्मक नळजोडणी धारकासाठी पाणी पट्टीचा दर निश्चित करावा व त्यात कालपरत्वे वाढ करण्यात यावी.

१०) वसूल करण्यात आलल्या पाणीपट्टीपैकी २० टक्के पाणीपट्टी ही मोठ्या देखभाल दुरुस्तीकरिता योजना राबविणाऱ्या संस्थेकडे ठेवण्यात यावेत. योजनेच्या पाईप्स या उपांगाची देखभाल दुरुस्ती प्रत्येक ५ वर्षांनी व इतर उपांगाची देखभाल दुरुस्ती प्रत्येक ३ वर्षांनी करावी.

११) योजना चालविणे त्याचे परिक्षण व देखभाल दुरुस्ती यासाठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासनाकडून कोणतीही मदत/अनुदान उपलब्ध करुन देणात येणार नाही.

१२) सदर योजनेतील सर्व गावे हागणदारी मुक्त असले तरी ते नेहमीच हागणदारी मुक्त राहतील याबाबत खात्री करावी.

१३) कोणत्याही कारणाने योजनेच्या खर्चात वाढ झाल्यास शासनाकडून जादा अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१४) सदर योजनेच्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटींची पूर्तता करण्यात यावी. तसेच संदर्भाधिन क्र.४ येथील शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१५) संदर्भाधिन क्रमांक ९ येथील दिनांक १५ जून, २०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार योजनेस त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणे अनिवार्य राहील.

१६) योजना स्वंयनिर्भर होण्यासाठी आवश्यक पाणीपट्टी निश्चित करणे व त्यात आवश्यकतेनुसर वाढ करणे ग्रामपंचायतीस बंधनकारक राहील. याबाबत जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी ग्रामसभेत ग्रामस्थांना स्पष्टपणे सविस्तर माहिती द्यावी व त्यानंतरच योजनेच्या कामास सुरुवात करावी.

१७) योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने योजना पूर्णत्वाचा दाखला सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१८) योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही स्वरुपाची अनियमितता, अपहार अथवा गैरव्यवहाराच्या बाबी निदर्शनास आल्यास अनियमिततेस जबाबदार संबंधित अधिकारी/ कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र राहतील.

१९) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनांकरिता विहित केलेली मानके पूर्ण करणे बंधनकारक राहील.

२०) योजनेच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे व योजनेच्या पूर्णत्वाचे दाखले संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून प्राप्त करुन घेवून शासनास सादर करण्याची जबाबदारी पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो), बेलापूर यांची राहील.

२. या योजनेवर होणारा खर्च जिल्हा परिषदेला प्राप्त होणाऱ्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतंर्गत प्राप्त होणाऱ्या केंद्र तथा राज्य निधीतून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६१२४४३९४२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Gorakh Bharate

Digitally signed by Ravindra Gorakh Bharate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96ee74617e9bb0cdcfad343ca5dc2e158423ad4dd919bcae9a0b9fc9b413b60b, serialNumber=fd232eb47eb633cb760c7bd2acf421b01b1da040dc965254760018b5f4e33be5, cn=Ravindra Gorakh Bharate
Date: 2019.09.19 14:35:46 +05'30'

(डॉ. रविंद्र भराटे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छतायांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा/विधान परिषद सदस्य
४. मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
५. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
६. मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,औरंगाबाद.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर
८. महालेखापाल,लेखा परिक्षा,महाराष्ट्र-२,नागपुर
९. महालेखापाल,लेखा परिक्षा,महाराष्ट्र-१,मुंबई
१०. संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो),बेलापुर,नवी मुंबई.

११.अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,लातूर.

१२.संचालक(वित्त),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सिडको भवन,बेलापुर,नवी मुंबई.

१३.उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,लातुर

१४.वरिष्ठ भुवैज्ञानिक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,

१५.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर.

१८) प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
मंत्रालय,मुंबई

१९)मु.अ.तथा वि.का.अ. ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
मंत्रालय,मुंबई.

२१.कार्यासने (पापु-०४,०६,०७,०९,१०,१३,१७ व २०),पा.पु.व स्व.वि.,मंत्रालय,मुंबई.

२२. निवडनस्ती कार्यासन पापु-१८.